# सातारा जिल्हा परिषद सातारा

**ग्रामपंचायत विभाग, दालन क्रमांक २३, ४ था, मजला**

e-mail – vptzpsatara2@yahoo.in दूरध्वनी क्रमांक ०२१६२- २३३८४३


## जाहीर कोटेशन नोटीस

जा.क्र/ग्राप/राग्रास्वअ/रा.अं.दौरा/ १२१८ /२०१९

ग्रामपंचायत विभाग

दिनांक :- १७ / १२/२०१९

**विषय :- टूर पॅकेज बाबत एकत्रित दर पत्रक देणेबाबत.**

मुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा जिल्हा परिषद यांनी खालील तपशिलात नमूद केल्यानुसार राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान सन २०१९-२० अंतर्गत **कोकण महसुली विभागातील रायगड जिल्ह्यातील आंबेपूर, बोर्झे, सावळे, जासई, नेरळ, शिरवली, रोहबद्रुक, चांदोरे वरंडोली, फळसप, काटेतळी, दिवेआगर, साळाब, सुधागडपाली व फळशेत कर्नाळा** या ग्रामपंचायतींमधील विकास कामांचा अभ्यास करण्यासाठी नाविन्यपूर्ण नोंदणीकृत/मान्यताप्राप्त टूर्स अॅन्ड ट्रॅव्हल्स कंपनी/संस्थांकडून मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदरची दरपत्रके दि. १७/१२/२०१९ ते दि. २६/१२/२०१९ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत समक्ष अथवा पोष्टाने पोहोच होतील अशा पध्दतीने सादर करावीत. विहीत मुदतीत व वेळेत प्राप्त होणारी दरपत्रके स्विकारली जातील. तदूनंतर प्राप्त होणारी दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

### दरपत्रकाचा विहित नमुना

| अ. क्र. | तपशील | एकत्रित प्रति व्यक्ती/पॅकेज दर (सर्व करांसहित) |
|---|---|---|
| १ | १) सातारा जिल्हा परिषद ते कोकण विभागातील रायगड जिल्ह्यात दि. ०७/०१/२०२० ते दि.०९/०१/२०२० या कालावधीत सर्व जाणे-येण्याचा व स्थानिक प्रवास.<br>२) दौऱ्यामध्ये होणाऱ्या दोन मुक्कामांच्या बाबतीत उत्तम प्रतिची निवास व्यवस्था.<br>३) दौरा कालावधीतील आवश्यक चहा संख्या-७ वेळा, नाश्ता संख्या-३ वेळा व दुपारचे व सायंकाळचे भोजन संख्या-५ वेळा, सहभागी प्रतिनिधी संख्या – ३८. | |

प्राप्त दरपत्रके दि.२७/१२/२०१९ रोजी दुपारी २.४५ वा. उपस्थित पुरवठादारांचे समक्ष उघडणेत येतील.

## अटी व शर्ती

१) या अभ्यास दौऱ्यासाठी प्रति व्यक्ती र. रु. २५००/- प्रति दिन याप्रमाणे तिन दिवसांसाठी एकत्रित र.रु. ७५००/- इतकी खर्चाची अनुज्ञेय मर्यादा लक्षात घेऊन सर्व करांसहित दरपत्रके सादर करण्याची आहेत.

२) सदरची दरपत्रके दोन लखोटा पध्दतीने सादर करावयाची आहेत.

**अ) तांत्रिक लखोटा (लखोटा क्र. १) -** दरपत्रके सादर करणाऱ्या मान्यताप्राप्त/नोंदणीकृत संस्थांनी लखोटा क्र. १ (तांत्रिक लखोटा) मध्ये खालील कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

१) संस्था नोंदणीकृत व मान्यता प्राप्त असलेबाबतचा सक्षम प्राधिकरणाचा (शॉप ॲक्ट) दाखला/प्रमाणपत्र.

२) सन २०१८-१९, २०१७-१८ व सन २०१६-१७ या वर्षांची आयकर विवरणपत्रे.

३) दरपत्रके सादर करणाऱ्या मान्यता प्राप्त/नोंदणीकृत टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स संस्थांनी त्यांनी, त्यांच्यामार्फत आयोजित केलेल्या शासकीय अभ्यास दौऱ्याबाबतचा किंवा शासकीय कार्यक्रमांस प्रतिनिधी उपस्थित ठेवणेबाबत केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने अनुभवाचे प्रमाणपत्र.

४) या, संपूर्ण अभ्यास दौऱ्याच्या प्रवासासाठी किमान ४० आसनक्षमता असलेले सुस्थितीतील प्रवासी वाहतूक परवाना नोंदणी असलेले वाहन व त्याच्या विमा नोंदणीबाबतचे प्रमाणपत्र.

५) या अभ्यास दौऱ्यामध्ये संपूर्ण प्रवासाकरिता वापरण्यात येणाऱ्या वाहनाच्या पथकर, वाहन पार्किंग कर तसेच ऐनवेळी सदरचे वाहन नादुरूस्त झाल्यास, त्याऐवजी तातडीने दुसऱ्या वाहनाची व्यवस्था करणे दरपत्रक सादर करणाऱ्या टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स कंपनीवर बंधनकारक राहील याबाबतचे हमीपत्र.

६) मुक्कामाच्या ठिकाणी नियोजित रायगड येथील हॉटेल/लॉजेस याबाबतची पूर्ण पत्त्यासह यादी व्यवस्थेच्या प्रकारासह सादर करणे आवश्यक आहे.

७) तांत्रिक लखोटयातील नमूद सर्व कागदपत्रे सादर करणा-या पात्र पुरवठादारांचाच व्यापारी लखोटा म्हणजेच लखोटा क्रमांक-२ उघडण्यात येईल.

**ब) व्यापारी लखोटा (लखोटा क्र. २) -** दरपत्रके सादर करणाऱ्या मान्यताप्राप्त व नोंदणीकृत संस्थांनी लखोटा क्र. २ (व्यापारी लखोटा) मध्ये खालील कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

१) यामध्ये निवास, दौऱ्याचा संपूर्ण प्रवास व दौऱ्यामधील चहा, नाष्टा व भोजन याचे एकत्रित प्रती व्यक्ती सर्व करांसहित दर नमूद असलेले जाहीर नोटीसीतील नमुन्याप्रमाणे दरपत्रक.

**क) दौ-यासंबंधी विशेष अटी व शर्तीः-**

१) या दौऱ्यातील प्रतिनिधीमध्ये काही महिला असून त्यांचेकरिता स्वतंत्र निवासाची व्यवस्था करण्यात यावी. यामध्ये एका खोलीमध्ये जास्तीत जास्त २ प्रतिनिधी या प्रमाणे निवासाची व्यवस्था करण्यात यावी. तसेच पुरूष प्रतिनिधी यांचेही एका खोलीमध्ये जास्तीत जास्त २ प्रतिनिधी या प्रमाणे निवासाची व्यवस्था करण्यात यावी.

२) अभ्यास दौऱ्यामध्ये समाविष्ट होणारे प्रतिनिधी हे जिल्हा परिषद सातारा येथील पदाधिकारी व अधिकारी असल्याने ही बाब विचारात घेऊन त्यानुसार उत्तम पध्दतीने चहा, नाश्ता, भोजन व निवासाची व्यवस्था करण्यात यावी.

३) या अभ्यास दौऱ्याकरिता दरपत्रके मागविण्याबाबतची जाहीर नोटीस जिल्हा परिषद नोटिस बोर्ड तळमजला येथे व सातारा जिल्हा परिषदेच्या (**www.zpsatara.gov.in**) संकेतस्थळावर दि. १७/१२/२०१९ ते दि. २६/१२/२०१९ या कालावधीमध्ये प्रसिध्द करण्यात येईल.

४) नोंदणीकृत/मान्यताप्राप्त टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्स कंपनींनी त्यांचे लखोटे (लखोटा क्र. १ व २- तांत्रिक लखोटा/व्यापारी लखोटा) दि. २६/१२/२०१९ चे सायं. ५.०० वाजेपर्यंत सादर करावेत. प्राप्त दरपत्रके उपस्थितांसमोर दि. २७/१२/२०१९ रोजी दुपारी २.४५ वाजता उघडण्यात येवून पात्र पुरवठाधारकास कार्यारंभ आदेश देण्यात येईल.

५) अपूर्ण व खोटी अथवा चुकीची माहिती सादर केलेल्या पुरवठा धारकाच्या बाबतीत निवीदा प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

६) अभ्यास दौऱ्याकरिता प्राप्त झालेली दरपत्रके/निवीदा प्रक्रिया कोणतेही कारण न देता, कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांनी राखून ठेवलेला आहे. याबाबत कोणतेही स्पष्टीकरण मागता येणार नाही.

**(अविनाश फडतरे)**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं)**
**सातारा जिल्हा परिषद सातारा**

17.12.19
**(~~संजय~~ भागवत)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**सातारा जिल्हा परिषद सातारा**